प्रेस नोट दि.१२/०१/२०२३

तलाठी ( अति.कार्य.) धसई व कोतवाल ता.शहापूर यांना लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | शहापुर पोलीस स्टेशन,ठाणे ग्रामीण |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) धनंजय राजेंद्र शेटकार वय ३६ वर्षे पद– तलाठी सजा. धसई ता.शहापूर जि.ठाणे वर्ग–३<br>२) मल्हारी परसू भेरे वय ५२ वर्षे पद– कोतवाल धसई ता.शहापूर जि.ठाणे. वर्ग–४ |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ६०,०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ५०,०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांच्या आईचे नावे असलेले नमुद जमीन ही रेल्वे प्रक्ल्पासाठी भूसंपादित केली असल्याने तिची नुकसान भरपाई रक्कम मिळवून देण्यासाठी तक्रारदार यांच्या आईचे नावाचा वास्तव्याचा दाखला व तहसिल कार्यालयातून वरीष्ठांना त्याबाबत अनुकूल अहवाल पाठविण्यासाठी तलाठी शेटकार व कोतवाल मल्हारी यांनी रु ६० हजार लाचेची मागणी केली होती त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दि.३०/१२/२२ रोजी ६०,०००/–रु. लाचेची मागणी करीत असले बाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.३०.१२.२०२२,तसेच ०२.०१.२३ व दिनांक ०५.०१.२३ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक मल्हारी भेरे कोतवाल धसई वर्ग–४ व आरोपी लोकसेवक धनंजय शेटकार तलाठी सजा अति.कार्य.धसई ता. शहापूर वर्ग–३ यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– लाचेची मागणी केल्याचे व लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाल्याने एसीबी ठाणे युनिटने आज दि.१२.०१.२०२३ रोजी तहसिल कार्यालय शहापूर येथे सापळयाचे आयोजन केले असता आरोपी लोकसेवक शेटकार यांनी तक्रारदार यांचेकडून ५०,०००/–रु.लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लागलीच ताब्यात घेण्यात आले. असून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. |
| | | |

**मार्गदर्शन अधिकारी– मा.श्री.सुनिल लोखंडे सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.अनिल घेरडीकर अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे.**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९
७) हॉट्सअप क्र :–९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे

(स्वप्निल जुईकर)
पोलीस निरीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, ठाणे.

Scanned with OKEN Scanner